**Lokmat 29.03.20**

# ध्वनिफीत लावून दत्तवाडी पोलिसांनी केले प्रबोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**सहकारनगर :** कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांना कोरोना व्हायरस संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय आपत्ती व्यवस्थापन पुणे यांचा नागरिकांच्याकरिता प्रतिबंधबाबतचा आदेश निघाल्याने बऱ्याच भागांमध्ये हा आदेश नक्की काय आहे, याबाबत संभ्रमावस्था निर्माण झाल्याने पोलीस स्टेशनला लोक फोन करुन याबाबत वेळोवेळी विचारणा करतात.

यावर स्थानिक पोलीस आलेल्या फोन कॉलला उत्तर म्हणून दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या आदेशामधील कोणत्या गोष्टींना प्रतिबंध केला आहे व कोणत्या गोष्टी चालू ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे याबद्दल एक सीडी तयार करुन ती ध्वनिफीत पोलीस स्टेशनच्या शासकीय वाहनावर लावून जनता बसाहत, आंबील ओढा कॉलनी दत्तवाडी परिसर शिवदर्शन, पर्वती दर्शन सहकारनगर, लक्ष्मीनगर, फिरुन सदर ध्वनीफित लोकांना ऐकवून त्यांच्यामध्ये निर्माण झालेला गैरसमज दूर करण्यात आला आहे. या त्यांच्या उपक्रमास स्थानिक नागरिक व व्यापारी बंधू यांनी मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. अनेक नागरिक स्वत:हून शंका विचारतात व त्या शंकांचे निरसन देविदास घेवारे हे करत आहेत.

मित्रमंडळ कॉलनी, विजयनगर कॉलनी पर्वती शिवदर्शन, सहकारनगर, आंबील ओढा परिसर, दत्तवाडी सिंहगड रोड, विजयानगर या भागात प्रत्यक्ष फिरुन नागरिकांचे प्रबोधन केले आहे.

प्रत्येक नागरिकाने स्वत:हून शासनाने व आरोग्य विभागाने दिलेल्या नियमांचे पालन करावे, ज्यामुळे कोरोना विषाणूचा संसर्ग इतरांना होणार नाही व हा विषाणू रोखण्यात आपण यशस्वी होऊ, असे नागरिकांना देविदास घेवारे यांनी आवाहन केले आहे.

**Prabhat 27.03.20**

## हात जोडून विनंती...



पुणे : करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यात संचारबंदी करण्यात आली असतानाही नागरिक बाहेर पडत असल्याने पोलिसांकडून हात जोडून त्यांना घरी थांबण्याची विनंती करण्यात येत आहे.

**Sakal 23.03.20**



पुणे : नागरिकांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहन करताना दत्तवाडी पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी.

**Prabhat 22.03.20**






सहकार नगर : नागरिकांना मोफत सॅनिटायझर व मास्कचे वाटप करताना जयराज लांडगे व इतर.

## दहा हजार सॅनिटाइझर बाटल्यांचे वाटप

**सहकारनगर, दि. २१ (प्रतिनिधी)** - करोना विषाणूने जगभरात थैमान घातले असून पुण्यामध्ये कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण सापडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. सॅनिटायझरची गरज असल्याने त्याच्या किंमतीही वाढल्या आहेत तसेच उपलब्धही होत नाही. यामुळे सामान्य नागरिकांना सॅनिटायझर घेणे शक्य होत नाही.या पार्श्वभुमिवर पर्वती परिसरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे दहा हजार सॅनिटायझर व मास्कचे वाटप करून करोना आजराबाबत जनजागृती करण्यात आले. यावेळी पोलीस बांधवानाही सॅनिटायझर व मास्कचे वाटप करण्यात आले. करोना विषाणूने जगभरात थैमान घातले असून पुण्यामध्येही रुग्ण आढळल्याने वस्तीमधील नागरिकांनी दुर्लक्ष न करता याकडे गांभीयनि पाहणे गरजेचे आहे. यामुळे चाळी व वस्तीमध्ये सॅनिटाझर वाटप उपक्रम राबविण्यात आला तसेच नागरिकांनी स्वच्छता राखावी, वारंवार हात धुतले पाहिजे, गरज नसल्यास घरा बाहेर जाऊ नये, गर्दी करु नये, लहान मुले व ज्येष्ट व्यक्तींना घराबाहेर पाठवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी मनसेचे पुणे शहर अध्यक्ष जयराज लांडगे यांनी परीसरातील सर्व वस्तीभागात प्रोबोधन केले. यावेळी अमर नाईक, रोहित ननावरे, वैभव नाईक, नागेश मलकंठकर, ऋतुराज भिंगारे आदी उपस्थित होते.

**Lokmat 19.04.20**

संडे अँकर | कलाशिक्षक भागुजी शिखरे यांचा उपक्रम | पोलिसांनाही मदत

# कॅलिग्राफीच्या माध्यमातून कोरोनाबाबत जागृती



### कॅलेंडरच्या कागदांवर घोषवाक्ये

'लोकमत'शी बोलताना भागुजी शिखरे म्हणाले, हातात कला आहे तर त्याचा सुयोग्य वापर केला पाहिजे, या जाणिवेतून घोषवाक्ये तयार केली. विद्यार्थ्यांचे ग्रुप निर्मित केले आहेत. टाळेबंदीच्या काळात दुकाने बंद आहेत. पेन आहे पण कागद नाही, अशी परिस्थिती असताना त्यातूनही मार्ग काढत जुन्या कॅलेंडरच्या कागदांचा वापर करून ही घोषवाक्ये तयार केली आहेत. शाळा सुरु झाल्यावर या घोषवाक्यांचे प्रदर्शन शाळेत भरविण्यात येणार आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : ज्याच्या अंगी कला असते तो कधी स्वस्थ बसू शकत नाही. टाळेबंदीच्या काळात शाळा बंद असल्या तरी एका कलाशिक्षकाने धडे देण्याचे काम सुरूच ठेवले आहे. फरक फक्त इतकाच आहे की कॅलिग्राफीतून घोषवाक्याचे फलक तयार करून ते कोरोनाविषयी समाजाचे प्रबोधन करीत आहेत. विशेष म्हणजे, हडपसर भागातील पोलीसदेखील त्यांच्या या घोषवाक्यांचा जनजागृतीसाठी वापर करीत आहेत.

भागुजी शिखरे असे या कलाशिक्षकाचे नाव आहे. पुण्यातील कै. जडावबाई नारायणदासजी दुगड विद्यालयातील विद्यार्थ्यांना ते चित्रकलेचे शिक्षण देतात. कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे देशात लॉकडाऊन करण्यात आले. यामुळे चालू शैक्षणिक वर्षात साधारण एक ते दीड महिन्याचा खंड पडला आहे. घरी बसण्याकडे आता संधी म्हणून पाहायला हवे व स्वत:ला अधिक सर्जनशील आणि संवेदनशील होण्यासाठी प्रयत्न करायला हवा, या भावनेतून त्यांनी हा उपक्रम हाती घेतला.

'आपले हात धुवा शुद्ध, कोरोनाशी जिंकू युद्ध', 'कोरोनाला घालण्या आळा, विनाकारण गर्दी टाळा', 'आरोग्याचे नियम पाळा, कोरोनाचा आजार टाळा', 'करू कोरोनावर मात, देऊ पोलिसांना साथ, 'स्वस्थ रहा सुरक्षित रहा', पोलिसांकडेही माणूस म्हणून पाहा', अशा प्रकारची ६० घोषवाक्ये आणि कविता कॅलिग्राफी (सुलेखन)च्या माध्यमातून तयार केली आहेत. यासाठी मार्कर, कर्वनिब पेन, स्केच पेन अशा साहित्यांचा वापर त्यांनी केला आहे.



पोलिसांनीदेखील कोरोनाबाबतची घोषवाक्ये वापरली आहे.

**Lokmat 30.04.20**

मास्क व सॅनिटायझरचा आहेर : रेड झोनमधून वधू ग्रीन झोनमध्ये

# कात्रज येथे पोलिसांकडून नवदांपत्याचे स्वागत!

लोकमत न्यूज नेटवर्क

कात्रज : धनकवडी येथील हर्षल पवार व कोंढवा खुर्द येथील रेश्मा ननवरे यांनी नवरीमुलीच्या घरीच दोघांच्या आई-वडिलांच्या उपस्थितीत विवाह केला. ज्या वेळी हे नवदाम्पत्य कात्रज चौक येथे आले त्या वेळी पोलिसांकडून पास तपासणी करून मास्क व सॅनिटायझर आहेर देत स्वागत केले.

पोलीस निरीक्षक गुन्हे विष्णू ताम्हाणे, नगरसेवक वसंत मोरे, सहायक पोलीस निरीक्षक श्रीशैल्य चिवड शेट्टी, कुंदन शिंदे, परशुराम पिसे आदींसह पोलीस कर्मचारी या वेळी उपस्थित होते. नगरसेवक वसंत मोरे यांनी नवदाम्पत्याच्या स्वागतासाठी सॅनिटायझर केलेली फुले उधळून स्वागत केले.

हर्षल व रेश्मा यांचे लग्न सहा महिन्यांपूर्वी ठरले होते. मात्र, कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाउन असल्याने त्यांना अपेक्षेप्रमाणे लग्न करता आले नाही. त्यांनी रेश्मा यांच्या घरी दोघांच्या मोजक्या चार नातेवाईक यांच्या उपस्थितीत विवाह केला. तसेच पुणे पोलीस आयुक्तालय यांचा परवाना घेऊन नववधूवर धनकवडीत आले.

स्वागतप्रसंगी हर्षल व रेश्मा यांनी प्रतिक्रिया दिली. प्रत्येक मुलीच्या आयुष्यात लग्नाबद्दल खूप अपेक्षा असतात. मात्र आपल्या आनंद, अपेक्षापेक्षाही समाजाचे, देशाचे हित कशात आहे हे पाहून निर्णय घ्यावा लागतो. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व संसर्ग होऊ नये म्हणून अगदी मोजक्या चार नातेवाईक यांच्या उपस्थितीत लग्न केले, असे वधूवरांनी सांगितले.

भारती विद्यापीठ पोलिसांनी आरोग्याचा मंत्र देत सॅनिटायझर, मास्क व हँडग्लोज आहेर म्हणून देत शुभेच्छा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.



कात्रज चौक येथे नववधूवराचे स्वागत करताना नगरसेवक वसंत मोरे, विष्णू ताम्हाणे आदींसह पोलीस कर्मचारी.

**Mata 31.03.20**



**Mata 16.04.20**



Lokmat 28.04.20

**इफ्तार घरातच : समाजातील प्रतिष्ठितांकडून गरजूंना शिधावाटप**

# यंदाचा रमजान साधाच... कोंढवा-मोमीनपुराही शांत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ना कुठला गाजावाजा... ना खाद्यपदार्थांची रेलचेल... ना नवे कपडे... ना इफ्तार पार्ट्या... ना मशिदींमधला सामूहिक नमाज... रमजानच्या महिन्यात गजबजून जाणारे कोंढवा-कौसरबाग-मोमीनपुरा-लष्कर परिसर यंदा मात्र शांत शांत आहेत. कोरोनामुळे लागू करण्यात आलेल्या कर्फ्यूमुळे मुस्लिमबहुल भागातही शांतता पाहायला मिळत आहे. नागरिक घरामध्ये उपलब्ध असलेल्या वस्तूंवरच 'सहेरी' आणि 'इफ्तारी' करीत असल्याचे चित्र पाहायला मिळते आहे.

कोरोनामुळे सर्वच समाजाच्या

**ग्राऊंड रिपोर्ट**

सणांवर बंधने आली आहेत. मुस्लिम धर्मीयांचा सर्वात महत्वाचा सण म्हणजे रमजान. या महिन्याची सर्वजण आवर्जून वाट पहात असतात. परंतु, यंदा कोरोनाचे सावट या सणावरही पाहायला मिळते आहे. दरवर्षी पहाटेपासूनच मशिदींसह कोंढवा, मोमीनपुरा आदी मुस्लिमबहुल भागात रेलचेल दिसते. मशिदींवर रोषणाई केलेली असते. या महिन्यात दिवसभर उपवास (रोजा) केला जातो. उपवासाला सुरुवात करण्यापूर्वी पहाटे (सहेरी) खाऊन घेतले जाते. तसेच संध्याकाळी उपवास (इफ्तार) सोडला जातो.



> घरामध्ये जे काही उपलब्ध आहे, त्यावरच सहेरी किंवा इफ्तारी केली जात आहे. फळे महागली आहेत. अनेकांना केळी-कलिंगडासारखी स्वस्त फळेही खरेदी करणे अवघड झाले आहे. कष्टकरी वर्गासह श्रीमंत वर्गालाही यंदाचा सण अडचणीचा आहे. लोकांकडे पैसे नाहीत. समाजातील प्रतिष्ठितांकडून शिधा, फळे वाटप सुरु आहे. परंतु, देणाऱ्यांनाही मर्यादा आहेत. रमजानचा महिना असूनही फळांना उठाव कमी आहे. स्वस्त आणि महागडी अशी दोन्ही प्रकारची फळे खरेदी करण्याचे प्रमाण कमी झाले आहे.
>
> **- उस्मान शेख,** फळ व्यापारी

नागरिक सहेरी आणि इफ्तारसाठी मोठ्या प्रमाणावर फळे, विविध प्रकारचे खाद्यपदार्थ खरेदी करुन ठेवत असतात. विशेषत: कोंढवा, मोमीनपुरा, लष्कर भागात दुकाने सजलेली असतात. शहराच्या विविध भागामधून केवळ मुस्लिमच नव्हे तर अन्य धर्मीय नागरिकही या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी याठिकाणी येत असतात. परंतु, यंदा लॉकडाऊनमुळे हा संपूर्ण भाग बंद आहे. सर्व हॉटेल, खाद्यपदार्थांच्या गाड्या, कपड्यांची दुकाने बंद आहेत. प्रशासनाने ठरवून दिलेल्या वेळेतच नागरिक बाहेर पडून आवश्यक तेवढ्या वस्तू खरेदी करून जातात. अनेकांकडे पैसेच उपलब्ध नसल्याने रमजान कसा साजरा करायचा असा प्रश्न आहे. रिक्षाचालकांपासून ते मोलमजुरी करणाऱ्या कष्टकऱ्यांना यंदाचा रमजान अगदी साधेपणाने साजरा करावा लागणार आहे.

लहान मुलांसह मोठेही आवर्जून कपडे खरेदी करीत असतात. मुलांसाठी खेळणी आणि विविध वस्तू आनंदाने खरेदी केल्या जातात. परंतु, यंदा कपडा बाजारही बंद असल्याने जुन्याच कपड्यांवर समाधान मानावे लागणार आहे. घरामध्ये जे साहित्य उपलब्ध आहे त्यावरच उपवास सोडले जात असून, अनेकांना बाहेर चढ्या भावाने विकल्या जाणाऱ्या वस्तू विकत घेणे परवडत नाही. एवढे असतानाही नागरिकांकडून प्रशासन आणि पोलिसांना सहकार्य दिले जात असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

Mata 20.04.20

# डॉक्टर आणि पोलिस खरे हिरो

**म. टा. प्रतिनिधी, हडपसर**

'डॉक्टर आणि पोलिस हे खरे हिरो आहेत. मनापासून त्यांना मानाचा मुजरा. सीमेवर उभे राहून ज्याप्रमाणे जवान लढतात, त्याप्रमाणे डॉक्टर आणि पोलिस रस्त्यावर थांबून लढा देत आहेत. करोनाचा शत्रू उंबरठ्याच्या बाहेर आहे. त्याला खांद्यावर घेऊन घरामध्ये आणू नका. ही लढाई प्रत्येक नागरिकांसाठी आहे. सरकारने दिलेल्या सूचनांचे पालन सर्वांनी केले पाहिजे,' असे आवाहन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केले.

खासदार डॉ. कोल्हे यांच्या जगदंबा प्रतिष्ठान, नोबेल हॉस्पिटल व हडपसर विधानसभा मतदार संघाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांची तपासणी करण्यात आली. या प्रसंगी आमदार चेतन तुपे, नोबेल हॉस्पिटलचे मुख्य व्यवस्थापक डॉ. दिलीप माने, डॉ. एच. के. साळे, पुणे शहर पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त कल्याण विधाते, हडपसर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश साठे, जिल्हा नियोजन सदस्य अमोल हरपळे, मंगेश वाघ, डॉ. शंतनू जगदाळे आदी उपस्थित होते. हे शिबिर फिरते असून, याचा अनेकांना लाभ होत आहे.

या वेळी गाडीतळ चौक, १५ नंबर, भेकराई चौक, मंतरवाडी चौक, हडपसर गाव, गांधी चौक या ठिकाणी बंदोबस्तावर असलेल्या ५० पोलिसांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

दिगंबर माने



**हडपसर, गाडीतळ चौक येथे बंदोबस्तावरील पोलिसांची आरोग्य तपासणी करण्यात आली.**

> **करोनाला हरवायचे असल्यास प्रत्येकाने घरी बसून सरकारला मदत करावी. हडपसर भागात सेंट्रल किचनद्वारे रोज १० हजार नागरिकांना जेवण देण्यासाठी नियोजन करीत आहोत. यासाठी नगरसेवकांच्या फंडामधून प्रत्येकी पाच लाख रुपये देण्यात यावेत, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. ही मागणी पवार यांनी मान्य केल्याने हडपसर भागातील नागरिकांच्या जेवणाची सोय करण्यात येत आहे.**
>
> **- चेतन तुपे,** आमदार



**रोटरी क्लबतर्फे मदत :** रोटरी क्लब ऑफ पुणे लोकमान्य नगरतर्फे पुण्याच्या वाहतूक पोलिसांना सॅनिटायझर, मास्क वितरीत करण्यात आले. या वेळी डॉ. रवी धोत्रे. डॉ. अविनाश भोंडवे, प्रकल्प समन्वयक महेश घोरपडे आणि रोटरी क्लबच्या अध्यक्षा टीना रात्रा आदी या वेळी उपस्थित होते.

Lokmat 19.04.20

Mata 09.04.20



**पोलिसांचे संचलन** 'करोना'चा फैलाव रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाउनची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांनी कात्रज-दत्तनगर परिसरात बुधवारी संचलन केले.

**Lokmat 20.04.20**

# दुगड ग्रुपकडून बिबवेवाडीत अन्नछत्र

लोकमत न्यूज नेटवर्क



पुणे: उद्योगपती माणिकचंद दुगड यांच्या बिबवेवाडी येथील पुष्पमंगल कार्यालयात अन्नछत्र सुरु केले आहे. मातोश्री पुष्पादेवी दुगड अन्नछत्र दुगड ग्रुपच्यावतीने पाहिजे त्याला जेवण सुरु केले आहे.

पोलीस अधिकारी, बस्ती भागातील नागरिक किंवा ज्यांना गरज आहे अशा प्रत्येकासाठी दोन वेळचे जेवण देणार आहेत. अन्नछत्राचे उद्घाटन सहायक पोलीस उपायुक्त सर्जेराव बाबर, सुनील कलगुटकर, पोलीस निरीक्षक कुमार घाडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

दुगड ग्रुपच्यावतीने आम्ही ३ हजार गरजुंना एक महिना पुरेलएवढा किराणा किट दिले आहेत. मात्र अनेकांना तयार जेवणाची खूप आवश्यकता असल्याचे आमच्या निदर्शनास आले, त्यामुळे दररोज दोन वेळा २ हजार नागरिक पोटभर जेवतील एवढे जेवण तयार करण्याची आम्ही सुरुवात केली आहे.

माणिकचंद दुगड यांचा ३ मे रोजी वाढदिवस आहे. त्यामुळे हा उपक्रम आम्ही ३ मेपर्यंत चालू ठेवण्याचा निश्चय केला आहे व जर नंतरही लॉकडाऊन वाढले तर हे पुढे देखील हे अन्नछत्र चालूच राहणार आहे, असे प्रमोद दुगड यांनी सांगितले. कार्यक्रमाला कीर्तीराज दुगड, प्रकाश दुगड, प्रवीण दुगड, रवी दुगड, गौरव दुगड यांच्यासह दुगड परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

**Mata 06.04.20**



पतित पावन संघटना पुणे शहर आणि सहयोगी संस्थांतर्फे कात्रज येथे हँडवॉश, फिरते बेसिन, चहा-नाश्ता आणि साबुदाण्याच्या खिचडीचे वाटप करण्यात येत आहे.

**Mata 14.04.20**

# ट्विटरवरील 'मागणी'ला पोलिसांचा पुणेरी चिमटा

म. टा. प्रतिनिधी, पुणे




नागरिकांच्या विविध प्रश्नांची कधी काटेकोर, कधी उपहासात्मक तर कधी विनोदी पद्धतीने उत्तरे देण्यासाठी पुणे पोलिसांचे ट्विटर हँडल चांगलेच प्रसिद्ध आहे. सध्याच्या लॉकडाउनच्या काळात पुणे पोलिसांकडून ट्विटरवर केली जाणारी जनजागृती पाहून एका तरुणाने थेट ट्विटद्वारेच लग्नाची मागणी घातली आहे.

'नमस्कार, जो कोणी हे ट्विटर हँडल हाताळत आहे ... ती वीस वर्षांची महिला असेल, तर कृपया माझ्या लग्नाचा प्रस्ताव स्वीकारा. आयुष्याच्या उत्तरार्धात अंतराळ प्रवासाची योजना करीत आहे,' असे ट्विट करत लग्नाची मागणी घालण्यात आली आहे. त्यावर पुणे पोलिसांनीही ट्विट करीत चांगलेच प्रत्युत्तर संबंधित तरुणाला दिले आहे. 'ही मागणी फेटाळणे काहीसे कठीण आहे; पण या टीममध्ये अनेक महिला आणि पुरुषही काम करतात. बहुतेक जण खाकी वर्दीतले...जे फक्त पुण्यालाच फेऱ्या मारणे पसंत करतात.. फक्त पुण्याला,' असे उत्तर देऊन संबंधित तरुणाने घातलेल्या लग्नाच्या मागणीच्या गुगलीवर पुणे पोलिसांनी जोरदार षटकार मारला आहे.

सध्या लॉकडाउनच्या काळातही पुणे पोलिस आपल्या ट्विटर हँडलवरून लोकांना घरी राहण्याच्या सूचना देत आहेत आणि जे लोक सूचना ऐकत नाहीत, त्यांची चांगलीच फिरकी घेत आहेत. 'अगर मैं बाहर निकला तो...???' असा प्रश्न एका तरुणाने ट्विट केला होता. त्यावर उत्तर देताना पोलिसांनी त्याला चांगले सुनावले. 'अगर हम आप को अंदर कर दे तो..., अगर हम बिना बात के किसी को अंदर कर दे तो क्या सही होगा..? तो फिर बिना बात के बाहर जाना कैसे सही है,' असे प्रत्युत्तर पुणे पोलिसांनी दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून नागरिकांनी घेतलेल्या फिरकीला त्यांच्याच पद्धतीने उत्तर देण्याचे पुणे पोलिसांनी ठरवले आहे. त्यामुळे या विषयाची चांगलीच चर्चा रंगत आहे.

Mata 19.04.20

# ‘करोनासुरा’शी युद्धात गणेशभक्तांची साथ

## गणेश मंडळांचे साडेतीन हजार कार्यकर्ते 'एसपीओ'

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT

पुणे : करोनाचा वाढता फैलाव रोखण्यात पोलिसांची संख्याही कमी पडत आहे. अशा वेळी पोलिसांच्या मदतीसाठी सार्वजनिक गणेश मंडळांचे कार्यकर्ते पुढे आले आहेत. पोलिसांच्या परिमंडळ पाचमध्ये साडेतीन हजार कार्यकर्त्यांची विशेष पोलिस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, आता आपापल्या गल्लीत बंदोबस्त आणि नागरिकांना मदतीचे कार्य त्यांनी हाती घेतले आहे.

करोनाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून शहरात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. घराबाहेर पडू नये म्हणून नागरिकांना आवाहन केले जात आहे. मात्र, अनेक दिवस घरात बसून काही जण कंटाळले आहेत. त्यामध्ये खास करून तरुण वर्ग आहे. त्यामुळे ते गल्लीत फिरत आहेत. पुण्यात गणेश मंडळाची संख्या मोठी आहे. गल्लोगल्ली गणेश मंडळे असून, त्यांचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात आहेत. नेमक्या याच कार्यकर्त्यांचा वापर करून घेण्याची कल्पना पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांना सुचली. त्यांनी तातडीने गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची चर्चा केल्यानंतर त्यांनी मदतीची तयारी दर्शविली.

### झोन पाचमध्ये ४२०० 'एसपीओ'

झोन पाचमध्ये पोलिसांना मदतीसाठी एकूण चार हजार २०० विशेष पोलिस अधिकारी (एसपीओ) काम करत आहेत. त्यामध्ये गणेश मंडळाचे कार्यकर्ते साडेतीन हजार व साडेसातशे सोसायट्यांचे पदाधिकारी एसपी ओ म्हणून काम करत आहेत. त्यामुळे पोलिसांना काही प्रमाणात मदत झाली आहे.



शहरातील गणेश मंडळांचे कार्यकर्ते पोलिसांना मदत करत आहेत.

- एका मंडळाचे पाच कार्यकर्ते एसपीओ.
- त्या कार्यकर्त्यांनी त्यांची गल्ली सांभाळावी.
- गल्लीत गरजूंना पोलिसांच्या मदतीने अन्न, किराणा, गॅस, वैद्यकीय मदत करावी.
- स्वच्छता करून घ्यायची असेल, तर संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा.
- गरजू नागरिकांना मदत करावी
- गल्लीमध्ये नवीन कोणी व्यक्ती येत नाही ना, याकडे लक्ष ठेवावे.
- सर्व एसपीओ कार्यकर्त्यांना मास्क, सॅनिटायझर देण्यात आले आहे.

मटा विशेष

याबाबत बावचे म्हणाले, 'संपूर्ण शहरातील करोनाचा फैलाव पाहता पोलिसांचे मनुष्यबळ सध्या कमी पडत आहे. आम्हाला पोलिस मित्र काही ठिकाणी मदत करत आहेत. तसेच, काही सोसायट्यांमध्ये एसपीओ नेमले आहेत. तरीही मनुष्यबळाची आवश्यकता होती. पुण्यात गणेश मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात असून, त्यांचा उपयोग विधायक कामासाठी करून घेण्याची कल्पना सुचली. चर्चा केल्यानंतर अनेक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मदतीसाठी उत्साह दाखविला. त्यानंतर प्रत्येक मंडळांच्या पाच कार्यकर्त्यांना विशेष पोलिस अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. आतापर्यंत झोनमध्ये गणेश मंडळाचे साडेतीन हजार कार्यकर्ते विशेष पोलिस अधिकारी म्हणून काम करत आहेत. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन व्हॉट्सअॅप ग्रुप बनविले आहेत. त्याच्या माध्यमातून हे कार्यकर्ते करोनाला हरविण्यासाठी काम करत आहेत. या तरुण कार्यकर्त्यांची शक्ती एका विधायक कामासाठी वापरली जात आहे.'

Loksatta 27.04.20



रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर विमानतळ पोलिसांनी लोहगाव परिसरात पथसंचलन केले.

# रमजानच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे पथसंचलन

लोकमत न्यूज नेटवर्क

विमाननगर : रमजान सणाच्या निमित्ताने विमानतळ पोलिसांनी पोलीस ठाणे हद्दीत पथसंचलन केले. कोरोना आजाराच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजाने रमजान महिन्यातील नमाज घरातूनच अदा करावी, असे आवाहन पोलिसांनी या वेळी केले.

विमानतळ पोलिसांनी स्पीकर सिस्टीमद्वारे पायाघत जनजागृतीपर पथसंचलन केले. पोलीस निरीक्षक गजानन पवार, गुन्हे निरीक्षक बळवंत मांडगे यांच्यासह पोलिस ठाणेमधील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच राज्य राखीव पोलीस दलाचे पोलीस या पथसंचलनात सहभागी झाले होते. लोहगाव, पोरवाल रोड, कलवड या परिसरातून पथसंचलन करण्यात आले.

Loksatta 30.04.20



छायाचित्र : भारती विद्यापीठ पोलिसांना मास्कचे वाटप करताना कार्यकर्ते.

## पोलिसांना मास्क वाटप

आंबेगाव बुद्रुक - पोलीस प्रशासनातील कर्मचाऱ्यांनाही करोनाची लागण झाली आहे. समाजाच्या सुरक्षेची काळजी घेणाऱ्यांची काळजीही आपण केली पाहिजे, या विचारातून सामाजिक कार्यकर्ते गोवर्धन गाडेकर यांनी भारती विद्यापीठ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मास्कचे वाटप केले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत कुवर, पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीशैल्य चिवडशेट्टी, सहाय्यक पोलीस निरीक्षक कवठेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली भोसले, साहाय्यक पोलीस निरीक्षक मधुरा कोराने, संदीप पवार आदींसह इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन अंतर्गत सर्व पोलीस चौकीच्या कर्मचाऱ्यांना मास्क देण्यात आले. विसे मायनाले, अजय चिंचाणे, गिरीष बारवकर यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले. पोलीस प्रशासनाने या उपक्रमाबद्दल आभार मानले.

Mata 30.04.20



दंगलविरोधी पथक तैनात...

Mata 14.04.20

# व्हॉट्सअ‍ॅप वापरताय? सावधान!

## सायबर पोलिसांकडून मार्गदर्शक सूचना




म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोना विषाणूसंदर्भात अनेक अफवा पसरविणारे मेसेज पुढे पाठविले जाऊ लागले आहेत. त्यामुळे असे मेसेज पाठविणाऱ्यांच्या विरोधात सायबर पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली आहे. तसेच, व्हॉट्सअ‍ॅप वापराबाबत महाराष्ट्र सायबर पोलिसांनी नियमावली तयार केली असून, सूचनांचे पालन केल्यास काय कायदेशीर कारवाई केली जाईल, याची माहिती यामध्ये देण्यात आली आहे. त्यामुळे लॉकडाउनच्या काळात घरी बसल्याबसल्या सोशल मीडियाचा आधार असला, तरी त्याचा वापर करताना खबरदारी हवीच.



**ही कारवाई होऊ शकते...** व्हॉट्सअ‍ॅपवर अफवा पसरविणाऱ्या पोस्ट, व्हिडिओ टाकल्यास ग्रुप अ‍ॅडमिन व सदस्यांवर विविध कलमांनुसार कारवाई होऊ शकते.

**भारतीय दंड संहिता (आयपीसी) कलम १५३ ए**
एखाद्या व्यक्तीने दोन गट, धर्म यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यास त्याच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो. त्यामध्ये तीन वर्षे शिक्षेची तरतूद आहे.

**आयपीसी २९५ ए**
धार्मिक भावना दुखावण्याच्या हेतूने एखादी पोस्ट, व्हिडिओ, फोटो टाकणाऱ्याच्या विरोधात या कलमानुसार कारवाई केली जाते. यामध्येदेखील तीन वर्षे शिक्षा व दंड अशा शिक्षेची तरतूद आहे.

**आयपीसी १८८**
सार्वजनिकरीत्या काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर या कलमानुसार कारवाई केली जाते. यामध्ये सहा महिने शिक्षा व एक हजार रुपये दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

**आपत्ती व्यवस्थापन अधिनियम कलम ५४**
एखाद्या साथीच्या तीव्रतेशी संबंधित दिशाभूल करणारी माहिती पसरवून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर या कलमानुसार कारवाई केली जाते. त्या व्यक्तीला एक वर्ष शिक्षा व दंडही होऊ शकतो.

**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ आणि कलम १४४ (३)**
जिल्हा दंडाधिकारी यांना दिलेल्या अधिकाराचा वापर करून या कलमानुसार प्रतिबंधात्मक आदेश काढू शकतात. त्यामध्ये ते व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपबाबतही आदेश काढू शकतात. तसेच, व्हॉट्स ग्रुपच्या अ‍ॅडमिनला मेसेज पाठविण्याचा अधिकार ठेवण्याचा आदेश देऊ शकतात.

**आयपीसी ५०५**
जनतेला त्रास देण्यासाठी हेतूने खोट्या व खोडसाळ काढणाऱ्या बातम्या पसरविल्यास या कलमानुसार कारवाई केली जाते. यामध्ये तीन वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद आहे.

**आयटी अ‍ॅक्ट ६६ सी**
ओळख लपविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून बनावट स्वाक्षरी, संकेतशब्दाचा वापर करून खोटी माहिती पसरविणाऱ्यावर या कलमानुसार कारवाई केली जाते. यामध्ये तीन वर्षे ते एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे.

**महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ६८**
एखाद्या पोलिस अधिकाऱ्याने कर्तव्य पार पाडताना दिलेल्या आदेशाचे पालन न केल्यास या कलमानुसार कारवाई होऊ शकते.

**'व्हॉट्सअ‍ॅप' ग्रुपच्या सदस्यांनी ही काळजी घ्यावी...**

- ग्रुपवर सदस्यांनी विश्वासार्ह पोस्ट टाकाव्यात.
- ग्रुपवर आक्षेपार्ह पोस्ट आल्यास तत्काळ डिलिट करावी.
- ग्रुपवर एखादा व्हिडिओ, मेसेज, बातमी टाकताना त्याबाबत खातरजमा करूनच टाकावा.
- ग्रुपवर कोणी अफवा पसरविणारी, दोन धर्म, जातीमध्ये तेढ निर्माण करणारी माहिती टाकत असेल; तर त्याची माहिती तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्याला अथवा महाराष्ट्र सायबर सेलकडे करा.

**अ‍ॅडमिनने ही काळजी घ्यावी...**

- ग्रुप तयार करताना त्यामध्ये घेतले जाणारे सदस्य जबाबदार आणि विश्वासार्ह आहेत का, हे खात्री करूनच ग्रुपमध्ये घ्यावे.
- व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपच्या अ‍ॅडमिनने सदस्यांना ग्रुपवर पोस्ट करण्याच्या नियमांसंबंधी माहिती द्यावी.
- व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमधील सदस्य अनियंत्रितपणे वागत असतील; तर पोस्ट टाकण्याचा अधिकार फक्त अ‍ॅडमिनलाच घ्यावा.
- ग्रुपमधील सदस्यांना सांगूनदेखील ते आक्षेपार्ह पोस्ट टाकत असतील; तर त्यांच्याबाबत जवळच्या पोलिस ठाण्यात तक्रार करावी.



Prabhat 05.04.20



विश्रांतवाडी : पोलीस अधिकाऱ्यांकडे मास्क व सॅनिटायझर देण्यात आले.

### विश्रांतवाडीत पोलिसांना मास्क व सॅनिटायझर

विश्रांतवाडी - राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने विश्रांतवाडी पोलिसांना मास्क व सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे संयोजन विनोद पवार यांनी केले. यावेळी परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, विश्रांतवाडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) रवींद्र कदम, सहायक पोलीस निरीक्षक संदीप यादव व पोलीस कर्मचारी अनिकेत भिंगारे उपस्थित होते. करोना महामारीचा जग मुकाबला करीत आहे. प्रत्येकजण या आजारापासून वाचण्याचा प्रयत्न करीत आहे. जनतेच्या संरक्षणासाठी पोलीस व वैद्यकीय कर्मचारी आपला जीव धोक्यात घालत आहेत. या संकटाचा मुकाबला करण्यासाठी शासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन व्हायला पाहिजे. सामाजिक बांधीलकीतून हा उपक्रम राबविल्याचे विनोद पवार यांनी सांगितले. यासाठी विजय देसाई, सचिन शिंदे, नचिकेत साळवी, श्रीनिवास मेखला यांनी सहकार्य केले.

Lokmat 12.04.20



**Loksatta 18.04.20**



# प्रतिबंधित भागांमध्ये आता कण्र्यांद्वारे प्रबोधन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोना विषाणूच्या संसर्गामुळे प्रतिबंधित जाहीर करण्यात आलेल्या भागांमध्ये आता कण्र्यांद्वारे नागरिकांचे प्रबोधन करण्यात येत आहे. पोलीस आणि जिल्हा प्रशासनातर्फे कण्र्यांच्या माध्यमातून उद्घोषणा करून नागरिकांमध्ये जागृती केली जात आहे.

करोना विषाणूच्या संसर्गाला प्रतिबंध करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुकारलेल्या जनता संचारबंदीनंतर महिनाभरापासून संचारबंदी लागू करण्यात आली आहे. गर्दी टाळण्याच्या उद्देशातून नागरिकांना घरात राहण्याचे आवाहन करण्यात आले असल्यामुळे सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. माणसांनी मोठ्या संख्येने जमू नये यासाठी मंदिरे भाविकांना दर्शनासाठी बंद ठेवण्यात आली असून मशिदीमध्ये नमाज पठण होत नाही. करोनाची बाधा झालेले रुग्ण मोठ्या संख्येने आढळून आल्यामुळे शहराचा पूर्व भाग प्रतिबंधित क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आला आहे.

जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी संचारबंदीच्या कालावधीतून सकाळी दहा ते बारा अशी दोन तासांची सूट देण्यात आली आहे. कालावधीत होणारी गर्दी टाळण्याचे तसेच सुरक्षित अंतर ठेवण्याचे आवाहन दररोज सकाळी दहा ते बारा या वेळेत केले जात आहे. तसेच या भागात सायंकाळी विनाकारण फेरफटका मारणाऱ्या नागरिकांना कण्र्यांद्वारे समज देण्यात येत आहे. पूर्व भागातील मंगळवार पेठेतील महापालिकेचे कमला नेहरू रुग्णालय, भीमनगर, कसबा पेठ येथील कागदीपुरा भाग तसेच नाना पेठ आणि भवानी पेठ परिसरात कर्णे बसविण्यात आले आहेत.

### कण्र्यांमुळे जरब

करोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या संचारबंदीच्या आदेशाचे पालन करावे, असे आवाहन तर केले जातेच. पण, त्याबरोबरच भंग करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात येत असल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून या भागांमध्ये विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांना जरब बसली आहे.

**Mata 10.04.20**



## आईची 'आई'

'करोना'चा फैलाव रोखण्यासाठी निम्म्या पुण्यात कर्फ्यू लावण्यात आला असून, नागरिकांच्या रक्षणासाठी ही मंडळी अहोरात्र झटत आहे. लोकांची सेवा करणाऱ्या पोलिसांची त्यांच्या घरातील मंडळी प्रेमाने काळजी घेत आहेत. चंदननगर पोलिस ठाण्यातील कर्मचारी शीतल मेमाणे या जेव्हा काम संपवून घरी जातात, तेव्हा त्यांची कन्या घरात येण्यापूर्वी दररोज आपल्या आईच्या हातावर सॅनिटायझर देते. आणि काही क्षणांसाठी ही लेक आपल्या आईची 'आई' होते.

Counseling Social Awareness

**Prabhat 06.05.20**

## सिंहगड रस्ता परिसरात पाणीकपात रद्दची मागणी

सिंहगड रोड, दि. ५ (प्रतिनिधी) - पुणे महापालिकेने काही दिवसांपासून सिंहगड रस्ता परिसरातील माणिकबाग, हिंगणे, वडगाव बु. आदी भागात केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्यात कपात केली आहे तर होणारा पाणीपुरवठा देखील कमी दाबाने होत आहे. यामुळे पाण्यासाठी नागरिकांची पायपीट विनाकारण वाढली आहे, पाणी कपात त्वरित मागे घ्यावी, यासंदर्भातील शिवसेना पक्ष संघटिका पल्लवी पासलकर व समाजसेवक शिवाभाऊ पासलकर यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

# पोलिसांसह आमदारही रस्त्यावर...

## येरवडा परिसरात करोनाबाबत जनजागृती आणि आवाहन

येरवडा, दि. ५ (प्रतिनिधी) - घरी रहा, सुरक्षित रहा, असे आवाहन वडगावशेरी मतदार संघाचे आमदार सुनिल टिंगरे यांनी नागरिकांना केले. आमदार टिंगरे व विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रविंद्र कदम यांनी पायी चालून परिसराचा आढावा घेतला तसेच नियम पाळण्याचे आवाहनही नागरिकांना केले.



येरवडा : आमदार सुनिल टिंगरे व पोलीस निरीक्षक रविंद्र कदम यांनी जनजागृती रॅली काढली.

आमदार सुनिल टिंगरे व विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रविंद्र कदम व पोलीस कर्मचाऱ्यांनी टिंगरे नगर व धानोरी भागात जनजागृती रॅली काढली होती. यावेळी टिंगरे यांनी चौका चौकात नागरिकांशी स्पिकरवरुन संवाद साधला. गर्दी टाळा, घरी रहा, अत्यावश्यक काम असेल तरच घराबाहेर पडा, काळजी घ्या, अशा सूचना यावेळी पोलीस प्रशासनाने केल्या.

**Lokmat 23.05.20**

# आम्हाला वेळेवर जेवण मिळत नाही

## ज्येष्ठ नागरिकांची पोलिसांकडे धाव : ४७३ ज्येष्ठांच्या विविध कारणांसाठी तक्रारी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लॉकडाऊनमुळे गरीब, गरजू, ज्येष्ठ नागरिकांना रेशनिंगच्या जीवनावश्यक वस्तू मिळत नसल्याने त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली आहे. पुणे पोलिसांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक कक्षाच्या हेल्पलाईनवर शहरातील ४७३ ज्येष्ठ नागरिकांनी वेगवेगळ्या कारणांसाठी तक्रारी दाखल केल्या आहेत. यात जेवण मिळण्यासंबंधीच्या अडचणी अधिक आहेत.

ज्येष्ठ नागरिकांची प्रतिकारक्षमता कमी असल्याने त्यांना कोरोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी भरोसा सेल ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यात ज्येष्ठ नागरिकांनी जेवणासंबंधी अडचण, गॅस घरपोच न मिळणे, घरकाम करणाऱ्या महिला उपलब्ध न होणे, औषधे आणण्यास बाहेर जाता न येणे, पेन्शन व बँकसंदर्भात यासारख्या कारणास्तव पोलिसांकडे तक्रारींची नोंद केली आहे. याशिवाय ज्या ज्येष्ठ व्यक्तींना जेवण मिळाले नाही, त्यांना पोलिसांच्या वतीने अन्नधान्य किट उपलब्ध करून देण्यात आले आहे. कॅम्प परिसरातील एका वृद्धाश्रमात अन्नधान्याची कमतरता जाणवू लागली होती. पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी तातडीने त्या ठिकाणी मदत पोहोचवली.

ज्येष्ठ नागरिक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली चांदगुडे, महिला पोलीस कर्मचारी स्वामी, गायकवाड, सोनवलकर, बारसकर, गलांडे व सामाजिक सुरक्षा विभागाकडील कर्मचारी माने, भांडवलकर, गायकवाड यांनी ही गरजू लोकांपर्यंत ही मदत पोहोचवली.

**Loksatta 26.05.20**

# घरी नमाज पठण करून ईद साजरी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोना विषाणू साथीच्या पार्श्वभूमीवर घरी नमाज पठण करून मुस्लीम बांधवांनी सोमवारी रमजान ईद साजरी केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मशिदीतील नमाजचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. गळाभेटीऐवजी सुरक्षित अंतर राखून मुस्लीम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

चंद्र दर्शनानुसार पुण्यात ईद साजरी करण्यात आली. शहराच्या विविध भागातील मशिदींमध्ये तसेच ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण करण्याची प्रथा यंदा करोना संसर्गाचा धोका लक्षात घेता रद्द करण्यात आली. आझम कॅम्पसच्या फेसबुक पेजवर नमाज पठणाचे प्रक्षेपण करण्यात आले. मशिदीमध्ये मौलाना नसीम अहमद यांनी नमाज पठण केले. पाच हजार बांधवांनी हे प्रक्षेपण पाहून सुरक्षित अंतर ठेवून घरामध्येच नमाज अदा केली. पी. ए. इनामदार यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. कोंढवा खुर्द येथील न्यू प्रेस स्कूल येथे सर्व धर्मीयांना दूध वाटप करण्यात आले. नागरिकांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या पोलीस बांधवांना शीरखुर्मा आणि गुलाब पुष्प देऊन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



करोना विरोधातील लढाईमध्ये नागरिकांच्या सुरक्षेसाठी कार्यरत पोलिसांना रमजान ईदनिमित्त सोमवारी शीरखुर्मा देण्यात आला.

**Punyanagari 29.05.20**

# घरात थांबून सहकार्य करा : पीएसआय पाटील



**पुणे : प्रतिनिधी**

कोरोना व्हायरसच्या संसर्गावर मात करण्यासाठी प्रत्येकाने घरामध्ये थांबून सहकार्य केले पाहिजे. अत्यावश्यक सेवा आहे, त्यासाठी शासनाने सवलत दिली आहे. वयस्कर आणि लहान मुलांसाठी जास्तीची काळजी घ्या, असाही मार्गदर्शनपर सल्ला रस्त्यावर फिरणाऱ्या नागरिकांना थांबवून हडपसर पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस उपनिरीक्षिका आर. आर. पाटील यांनी दिला.

हडपसर गांधी चौक येथे हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश साठे आणि पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षिका आर. आर. पाटील, पोलीस शिपाई नवनाथ भोसले, विशाल बनकर, केशव वनवे आणि सुप्रिया गायकवाड यांच्या पथकाकडून नागरिकांना प्रबोधन करण्यात आले.

पाटील म्हणाल्या की, मागिल आठवड्यापासून देशभर लॉकडाऊन केले आहे. तुमच्या सुरक्षेसाठीच पोलीस कार्यरत आहेत. कोरोना व्हायरसचा संसर्ग टाळण्यासाठी पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनी घरामध्ये थांबा, बाहेर पडू नका असे आवाहन केले आहे. तुमच्यासह कुटुंबियांसाठी तुम्ही घरामध्ये थांबून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

**Prabhat 13.05.20**

# 'भरोसा सेल'चा ज्येष्ठांना आधार

**पुणे, दि. १२ -** शहरात करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता पोलिसांकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर सध्या पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. शहरातील सुमारे ११ हजारांहून अधिक ज्येष्ठांना संपर्क केल्याची माहिती ज्येष्ठ नागरिक कक्षाकडून देण्यात आली.

लॉकडाऊन कालावधीत ज्येष्ठांनी बाहेर पडू नये. यासह त्यांची प्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे करोनाचा धोका अधिक असतो, करोनापासून नागरिकांचे संरक्षण व्हावे. त्यांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी पुणे पोलिसांकडून संपर्क साधण्यात येत आहे. यासह लॉकडाऊन काळात काही अडचण आल्यास '१०९०' या ज्येष्ठ नागरिक हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे सांगण्यात येत आहे.

**Prabhat 12.05.20**



**पुणे :** विश्वकर्मा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पोलिसांना मास्क वाटप केले.

## विश्वकर्मा कॉलेजकडून पोलिसांना मास्क वाटप

**पुणे, दि. ११ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उभारलेल्या करोनामुक्ती जनजागृती अभियानांतर्गत बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित विश्वकर्मा कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी २,५०० मास्क तयार करण्याचा उपक्रम हाती घेतला व तो यशस्वीपणे पूर्ण केला. १० मे रोजी कोंढवा पोलीस चौकी, बिबवेवाडी पोलीस चौकी, भारती विद्यापीठ पोलीस चौकी, भाजीवाले,सफाई कामगार, सुरक्षारक्षक व इतर गरजूंना प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली मास्क वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात कॉलेजमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

**Prabhat 07.05.20**

लॉकडाऊन आहे बरं का...



**Sakal 01.05.20**



**शिवाजी रस्ता :** लॉकडाउनमुळे नाकाबंदी करण्यात आलेल्या पेठांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्याच्या सुरक्षेची जबाबदारी वाहतूक विभागाच्या महिला पथकाकडे आहे. हे पथक येथे अहोरात्र पहारा देत आहे.

**Prabhat 24.06.20**

# खबरदार... संक्रमित कुटुंबीयांशी वाईट वागाल तर

## पोलीस आयुक्तांच्या सूचना : सोसायट्यांसाठी नियमावली जाहीर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २३ - करोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुणे पोलिसांनी मार्गदर्शक नियमावली तयार केली आहे. त्या आधारे सोसायटीतील नागरिकांना सूचनांचे पालन करण्याचे आवाहन पोलीस आयुक्तांनी केले आहे. सर्व पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या सोसायट्यांना याबाबतची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शहरात करोना संसर्ग वाढत असतानाच सोसायट्यांमध्ये संक्रमण होत असल्याचे दिसून आले आहे. त्याला प्रतिबंध करण्यासाठी ही मार्गदर्शिका जारी केली. त्यामध्ये प्रवेशद्वाराचे नियमन कसे करायचे, सोशल डिस्टनिंग कसे पाळायचे, जीवनाश्यक वस्तू विक्रेता, कामगार, कुरिअर पुरविणारे याबाबतीत पाळायचे नियम मार्गदर्शक नमूद केले आहेत. तसेच, संक्रमित रुग्ण व कुटुंबीयांशी दुर्व्यवहार करू नये, असेही म्हटले आहे.

### प्रवेशद्वाराचे नियमन

- सोसायटीत प्रवेश करताना मास्कचा वापर अनिवार्य, प्रवेशद्वार व लिफ्टजवळ वॉश बेसीन, हॅन्ड सॅनिटायझर स्टॅन्ड बसवावा
- लिफ्ट, स्वच्छतागृह, जिना सॅनिटायझ्ड करावे.
- प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची थर्मल मशीनद्वारे शरीराचे तापमान मोजण्यात यावे.
- ऑक्सिमीटर मशीनद्वारे तपासणी करून ९५ पेक्षा पातळी कमी असल्यास संबंधित व्यक्तीची तत्काळ तपासणी करून घ्यावी.

### सोशल डिस्टन्सिंगचे पालन

सोसायटी परिसरात वावरताना दोन मीटर अंतर राखावे, गर्दी करू नये. परदेशातून किंवा इतर प्रांतातून आलेल्या व्यक्तींच्या संदर्भात विलगीकरणाच्या सूचनांची खात्री करून अंमलबजावणीकडे लक्ष द्यावे. घरकाम करणारी व्यक्ती घरात येईल तेव्हा तिला एक कापडी बॅग व्यक्तीगत वस्तू ठेवण्यासाठी द्यावी. हात, तोंड, चेहरा साबणाने स्वच्छ धुवायला सांगा, या व्यक्तींना मास्क वापरणे अनिवार्य करावे.

### जीवनावश्यक वस्तुविक्रेता, कामगार व कुरिअर यांचे नियमन

दूध, भाजीपाला, पेपर अन्य वस्तू विक्रेता, सफाई कर्मचारी, घरकाम करणाऱ्या महिला यांची प्रवेशद्वारावर दररोज स्क्रिनिंग टेस्ट व सॅनिटायझेशन नंतरच सोसायटीत प्रवेश द्यावा. घरकाम करणाऱ्या महिला, सुरक्षा रक्षक, वाहनचालाक प्रतिबंधित क्षेत्रात राहणारे नसावेत. पावसाळी दुरुस्ती व्यतिरिक्त इतर कोणतीही कामे करण्यास प्रतिबंध करावा. नवीन बांधकाम व नूतनीकरणाच्या कामास परवानगी देऊ नये.

**Lokmat 07.06.20**



PunekarPratul ह्या सामाजिक व्यासपीठाच्या माध्यमातून प्रतीक शुक्ल, तसेच त्याच्या मित्र परिवाराने रस्त्यावर कर्तव्य बजावणाऱ्या वाहतूक पोलिसांना मास्क आणि सॅनिटायझरचे वाटप केले.

**Prabhat 02.06.20**

# करोनायुद्धात पोलिसांचे कार्य प्रेरणादायी



## मोहन जोशी : अडीचशे पीपीई किट्सचे पोलिसांना वाटप

पुणे, दि. १ - करोनाविरुद्धची लढाई लढताना अनेक संकटे आली, अडथळे आले तरीही धीर खचू न देता पोलिसांनी कार्य सुरूच ठेवले, हे प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार मोहन जोशी यांनी केले.

युवा उद्योजक सुशील बंग यांच्या वतीने पोलिसांसाठी अडीचशे पीपीई कीट्स, मास्क, ग्लोव्हज आदी वैद्यकीय साहित्य जोशी यांच्या हस्ते भेट देण्यात आले. करोना बाधितांची ने-आण करताना पोलिसांना पीपीई किट्सची गरज भासते. अशावेळी ही कीट्स त्यांच्यासाठी सुरक्षाकवच म्हणून उपयुक्त ठरणारी आहेत. यातील काही किट्स महिला पोलिसांसाठीही उपयुक्त आहेत. मार्च महिन्यापासून पोलीस अतिशय धैर्याने आपले कर्तव्य पार पाडीत असल्याचे जोशी म्हणाले.

फरासखाना पोलीस स्टेशन इथे झालेल्या कार्यक्रमाला अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय शिंदे, उपायुक्त स्वप्ना गोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर आदी उपस्थित होते.

Prabhat 29.06.20

# पोलिसांच्या समुपदेशनानंतर वृद्धेचा जीव वाचला

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८ -** शहरात विविध कारणांनी आत्महत्या करण्याचे प्रकार समोर येत असताना पोलिसांनी केलेल्या समुपदेशनामुळे एका ज्येष्ठ महिलेचा जीव वाचला आहे. तातडीने पावले उचलत पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाल्याने या महिलेचा जीव वाचला. सुनीता गोरे (७५, रा. सदाशिव पेठ) असे या महिलेचे नाव आहे.

नाना-नानी पार्कजवळील नदीपात्रामध्ये एक महिला



आत्महत्या करण्यासाठी चालली असल्याचा कॉल कंट्रोल रूममध्ये आला. हा कॉल येताच याची शहानिशा करण्यासाठी पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी गेले. पोलीस शिपाई, बीट मार्शल यांचा यात समवेश होता. त्यांनी या महिलेचे समुपदेशन करून तिला आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले.

या महिलेचे नातेवाईक खडक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी आले होते. त्याचवेळेस एक महिला आत्महत्या करण्यास जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाव घेत या महिलेचे मतपरिवर्तन केले. त्यानंतर तिला त्यांचे जावई राजेश गोखले यांच्या ताब्यात देण्यात आले. पोलीस शिपाई तळवे, एकशिंगे, जगदाळे, गिऱ्हे, विर, कोल्हे यांच्यासह मार्शल पोलीस शिपाई यादव, ननवरे यांनी ही कामगिरी केली.

Prabhat 17.06.20



**पोलिसांचे तरी ऐका...**

**पुणे :** ताडिवाला रस्ता हा भाग कंटेन्मेन्ट झोन आहे. येथून बाहेर येण्या-जाण्यास नागरिकांना मनाई आहे. मात्र, आता लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर येथील नागरिक कामानिमित्त सांगून बाहेर पडत आहेत. यात प्रामुख्याने कामगारवर्गाचा समावेश आहे. पण, या परिस्थितीमुळे पोलिसांवर ताण वाढत आहे. नागरिकांनी नियम न पाळल्यास कोरोनाबाधितांची घटलेली संख्या यामुळे पुन्हा वाढण्याची भीती आहे.